
म. ग्र. स. ठाणे
विषय काव्य
क्र. नं. ८८७८
क्रम ९१३९

हें भिकारिणीचें दृश्य!

# भिकारीण



कवी:— मा. वें. मंगरूळी
मिरज.

RFFBK-0004506
REFBK-0004506

सारस्वत सेवा मंडळ, बेळगांव.

पुस्तक ३ रें.

# भिकारीण.

कवि,

माधव व्यंकटेश मंगसूळीकर,
मिरज.

REFBK-0004506
REFBK-0004506

प्रकाशक,

हिंदमाता एजन्सी, बेळगांव.

१९३१.

द्वितीयावृत्ति ] किंमत ४ आणे. [ प्रति १०००.

## सारस्वत सेवा मंडळाचीं पुस्तकें.

| | | | |
|---|---|---|---|
| शुभांगी (गद्य) | किं० २ आणे | | मंगसुळीकर |
| उधळलेलीं फुलें (पद्य) | ,, २ ,, | | अनंत-माधव. |
| भिकारीण | ,, | ,, ४ ,, | मंगसुळीकर. |
| दर्पदमन | ,, | ,, १ ,, | कमतनूरकर. |
| काव्यप्रमोद | ,, | ,, १ ,, | ,, |
| वेणूरव | ,, | ,, १ ,, | मंगसुळीकर. |
| विठ्ठल राधा | ,, | ,, ४ ,, | कै० अवसरे. |
| कण्हेरीचीं फुलें | ,, | ,, २ ,, | घारपुरे. |
| मातृभूमि | ,, | ,, २ ,, | भारतीभक्त. |
| नाट्यछटा | ,, | ,, ४ ,, | कमतनूरकर. |

### छापत आहे.

शारदेच्या उपवनांत .... अनंत-माधव.

देहाचें दान [नाटक] ... मंगसुळीकर.

स्मृतिकुंज [गद्यकाव्य] .... ,,

पुस्तकें मिळण्याचीं ठिकाणें:—

**सारस्वत सेवा मंडळ,**
**हिंदमाता एजन्सी,** } **बेळगांव.**

काव्य ८०८

# भिकारीण वाचण्यापूर्वी

भिकारीण काव्याची भूमिका सत्यसृष्टींत घडलेली आहे. फक्त कायद्याची कात्री चुकवावी ह्मणून, नांव गांव नोंदतां आलें नाहीं; तरीपण प्रत्येक हिंदूनीं विचार करण्यासारखी ही गोष्ट आहे. हिंदुसमाज किती दुर्बल होत चालला आहे, याचे हे खरेखुरे निनाद आहेत.

ही भिकारीण परत टाहो फोडून सांगत आहे कीं, "सोंवळ्या ओंवळ्याच्या दांभिक दिखावू ढोंगीपणांत जर तुह्मांला खितपत पडावें, असें वाटत असेल तर, खुशाल घोरत पडा; पण जर कां तुह्मांला हिंदु-संस्कृति टिकवावी, हिंदु-संस्कृतीचा बोज राखावा व हिंदु तेवढा मिळवावा, असें वाटत असेल, तर हरघडी घडणारे असले आपत्–प्रसंग टाळण्यासाठीं चढाईची लढाई जरी करतां आली नाहीं, तरी वढाई मारून वाचाळवीर होण्यापेक्षां स्वसंरक्षणासाठीं तरी दोन हात करण्याची हिंमत अंगीं आणली पाहिजे!"

माझ्या भिकारणीचे हे बोल पूर्णपणें लक्ष्यांत घेऊन, आचारांत कृतीनें करून दाखविल्यास, कवीला आपल्या कृतीची धन्यता वाटेल. हेंच वाचकांना वाचण्यापूर्वी सांगावयाचें होतें, तें सांगितलें.

आतां फक्त आभार मानण्याचा शिष्टाचार संपवून, भिकारणीच्या करुण कहाणीकडे वळूं.

भिकारणीची पहिली आवृत्ति प्रसिद्ध करून जगापुढें आणण्याचा उदारपणा ज्यांनीं दाखविला, असे ते माझे सहृदयी जीवाभावाचे स्नेही **श्रीमंत अप्पासाहेब देशपांडे,** मंगसूळीकर यांनीं छपाईचा सर्व खर्च आपल्या शिरावर घेऊन कवीला उपकृत करून ठेविलें, याबद्दल कवि त्यांचा कायम ऋणि आहे. तसेच, बेळगांव, सारस्वत सेवा मंडळांतील माझे सन्मान्य स्नेही व महाराष्ट्राचे परिचित कवि आणि नाट्यछटाकार अ. जि. कमतनूरकर, तरुण भारताचे संपादक भाई कल्याण, मिरजेचे प्रसिद्ध कवि वि. ज. सहस्त्रबुद्धे व कविमित्र सोलापूरचे व्यं. गो. अंदूरकर यांनीं आपापल्या परीनीं भिकारणीला हातभार लाविल्याबद्दल, कवि त्या सर्वांचा उपकृत आहे.

**मिरज,**
ता. १-९-३१.

पाईक,
**माधव व्यंकटेश मंगसूळीकर**

# पहिल्या आवृतीची प्रस्तावना.

'भिकारणी'सारख्या छोट्या काव्याला वस्तुतः पद्धतीच्या शब्दाची जरूरीच नाहीं; परंतु माझे मित्र श्री. मंगसुळीकर यांच्या आग्रहास्तव मी हे दोन शब्द लिहीत आहे.

कवि मंगसुळीकर यांनीं प्रस्तुत काव्यास निवडलेला प्रसंग खरोखर हृदयस्पर्शी आहे; आणि या प्रसंगावर रचना करितांना कवींनीं साध्या व समर्पक शब्दांची योजना केली असल्यानें, एकंदर काव्याची सजावट समाधानकारक झाली आहे. श्री. मंगसुळीकर यांची कविता नेहमींच साधी व सरस असते व त्यांच्या इतर स्फुट काव्याप्रमाणेंच प्रस्तुत काव्यहि सरस वठलें आहे, हें नमूद करावयास मला संतोष वाटतो. असल्या छोट्या काव्याच्याद्वारें समाज जागृतीचें कार्य श्री. मंगसुळीकर यांनीं सतत चालू ठेवावें, अशी त्यांना प्रेमाची सूचना आहे.

**काव्यविहारी.**

बी. ए., एल्एल्. बी., बुधगांव.

# प्रकाशकाचे दोन शब्द.

कवि माधव व्यंकटेश मंगसूळीकर यांच्या या भिकारीण काव्याची बोलबाला प्रथमावृत्तीच्यावेळीं महाराष्ट्र जनतेनें केलेली आहेच. प्रथमावृत्ति खलास होऊन लोकांच्या मागण्या सारख्या येऊं लागल्यानें, ही सचित्र द्वितीयावृत्ति काढणें भाग पडलें.

द्वितीयावृत्तीची परवानगी मागतांच कर्त्यांनीं उदार अंतःकरणानें देऊन प्रकाशकास उपकृत करून ठेविले आहे.

या सुधारून वाढविलेल्या दुसऱ्या आवृत्तीसाठीं कवि अ. जि. कमतनूरकर यांनीं आपुलकीनें विशेष तसदी घेऊन, प्रकाशकाला सर्वतोपरी सहाय्य केलें, याबद्दल प्रकाशक त्यांचाहि आभारी आहे.

प्रथमावृत्तीप्रमाणें याहि आवृत्तीला जनतेकडून सक्रीय सहानुभूति मिळेल अशी आशा करून, हे दोन शब्द पुरे करितों.

प्रकाशकः—जी. ए. मांजरेकर,
हिन्दमाता एजन्सी, **बेळगांव**.

## भिकारीण काव्याबद्दल विद्वद्वर्यांचें मत.

गुरुवर्य श्रीपाद कृष्ण कोल्हटकर खामगांव, हे आपल्या ता. २२।६।२९ च्या पत्रांत लिहितात:-

आपलें भिकारीण काव्य साधें, सुबोध व ठाकठिकीचें झालें आहे.

केसरी पत्राचे माजी विद्वान् संपादक श्री. नरसिंह चिंतामण केळकर पुणें, हे आपल्या ता० १०-६-२९ च्या पत्रांत लिहितात:-आपलें भिकारीण काव्य वाचलें. काव्य करुण आहे. भाषा सोपी व साधी आहे.

प्रसिद्ध लेखक वि. कृ. नेरूरकर, सावंतवाडी हे आपल्या ता. १०।६।२९ च्या पत्रांत लिहितात:—आपलें भिकारीण काव्याचें पुस्तक पोंचलें. काव्य हृदयस्पर्शी व सद्य:स्थिति दर्शक आहे.

या शिवाय इतर अनेक विद्वानांचे अभिप्राय मिळाले आहेत; पण, स्थळ संकोचास्तव ते प्रसिद्ध केले नाहींत.

# नियत कालिकांचे अभिप्राय.

**श्रद्धानंद**, मुंबई:--हें करुणरस गीत अगदीं साधें परंतु मन संतप्त करणारें आहे. गीताचा अंत शोकरसांत झाला असून, हें गीत गात असतांना खरें काव्य प्रत्ययास येतें.

**नवाकाळ**, दैनिक मुंबई:--सरळ वर्णन करून भावनाची उत्कटता व्यक्त करण्याचा कवीचा प्रयत्न चांगला साधला आहे.

**ज्ञानप्रकाश**, पुणें:--या काव्याचा प्रसंग खरोखरीच हृदयस्पर्शी आहे. वृत्त व भाषासरणी प्रसंगाला साधेल अशीच उपयोगांत आणिली आहे.

**सद्विचार**, बडोदें:--करुणजन्य प्रसंगाचें हृदयस्पर्शी चित्र यांत रेखाटिलें आहे.

**तरुण भारत**, बेळगांव:---हें हृदयस्पर्शी काव्य करुणजन्य आहे.

**प्रताप**, मुंबई:--प्रसंगाप्रमाणें या काव्याची मांडणी व भाषा हृदयस्पर्शी झाली आहे.

# भिकारीण.

[ × × × शहरीं उन्हाच्या तळपत्या अग्नींत भर बारा वाजतां कोणी एक 'भिकारीण' आपल्या मुलीचा शोध करीत होती. जरी ती 'भिकारीण' होती, तरी तिचें वात्सल्य वैभवशाली स्त्रीपेक्षांहि खात्रीनें जास्त होतें. आपल्या चुकलेल्या तरण्याताठ्या पोरीसाठीं बावरलेली ती भिकारीण करुण हंबरडा फोडून ह्मणते:— ]

(चाल—बोलले कोण या बोला। राजहंस माझा- )

" दु:खाचा कहर जहाला। गरिबाचा वाली नुरला!
॥ धृ० ॥

या फसव्या दुष्ट-जगांत। अन्याय मूर्त अवतरला॥
गरिबांसि छळाया नित्य। जणुं काळासम टपलेला॥
मी आणिक माझी सोनी
गांवांत भीक मागोनी
जगविला जीव दोघींनीं
वास ना कुपाला दिधला। गरिबाचा वाली नुरला!॥

२

जीवाची हरपे ठेव। शोधित्यें काल पासोनी॥
एकटी फिराया गेली। भिक्षेसि, लाडकी सोनी॥
क्षुधिता परि कांहिं न दिधलें। मी तिला अन्न वा पाणी
आठवें मला तें आतां
लागली घोर ही चिंता
होइल कां कोणी त्राता
भेटेल कसी मज बाळा। गरिबाचा वाली नुरला!॥

३

पोळती पाय ज्वाळांनीं। होतसे सुखाची होळी॥
दिन घालविलें म्यां दैन्यीं। परवा न कशाची केली॥
बाळेवरि आशा सारी। तिजवाचुनि कोण विचारी॥
गेलीस कुठें मम बाळे!
तुज शोधुनि शोधुनि दमल्यें
नयन हे भरूनी आले
सांगा हो, झडकरि मजला। गरिबाचा वाली नुरला!

४

तिजसाठीं साहुनि कष्टा । मी घालविलें आयुष्य ॥
पोटासि मिळेना अन्न । जगण्यांत नसें स्वारस्य ॥
लक्तरें शरीरीं असलीं । हें भिकारणीचें दृश्य ॥
फिरफिरुनी दारोंदार
जमवावे तुकडे चार
गरिबाचि कुणा दरकार
जगला जिव किंवा गेला । गरिबाचा वाली नुरला! ॥

५

भोगण्या क्लेश मज जन्मा । घातलें हाय ! देवानें ॥
मी माय, पोर ती माझी । अन्नाविण जगतीं फिरणें ॥
ही करुण स्थिति तुज देवा! । होतसे कशी रे बघणें ॥
मी काय कुणाचें केलें ?
भोगणें दुःख हें आलें
सौख्याशीं आतां मुकल्यें
देवाचा पडला घाला ! । गरिबाचा वाली नुरला ! ॥

६

अंधेची मम हो, कांठी । घेतली हिरावुनि कोणी ॥
लाभलें पुण्य त्या मोठें । नीच अशी करुनी करणी ॥
धुंडित्यें चहुंकडे फिरुनी ।मुखिं ह्मणताचि सोनी मोनी!
परि दया न येई कोणा
कोणा तरि येवो करुणा
द्या अपत्य मजला दाना
देवही रुष्ट कां झाला । गरिबाचा वाली नुरला ! ॥

७

मी न्हाणिन मम बाळेला । डोळ्याचें सांडुनि पाणी॥
अन् पाहिन नेत्र भरोनी । ती माझी कमलाराणी ॥
ऐकेन तियेच्या बोला । चुंबिन मग हृदया धरुनी॥
दीनेचा केला घात
किति आतां करुं आकांत
देवा ! मम बघसी अंत
कंठांत प्राण हा आला । गरिबाचा वाली नुरला ! ॥

८

करुं शोध तियेचा कोठें । नेत्रां पुढतीं अंधार ॥
दुर्दैवा साधिशि दावा । साहूं काशि दुःख अपार ॥
असहाय्य अशा दीनेला । प्रभु एक तुझा आधार ॥
ही पापी दुनिया सारी
दीनांचा हरि कैवारी
विरहार्णवि मज या तारी
दुःख भोग दैवीं लिहिला । गरिबाचा वाली नुरला ॥

९

मज गेले सोडुनि नाथ । स्वर्गात देवरायाच्या ॥
पदरांत घेउनी बाळा । मी फिरें दारिं लोकांच्या ॥
सांभाळ तियेचा केला । कठिण काळिं दारिद्र्याच्या ॥
ती चुकली बाळा माझी
हृदयाची कलिका ताजी
चांदणी अहा ! फुलबाजी
आणा कुणि झडकरिं तिजला । गरिबाचा वाली नुरला

१०

तारुण्य भराला आलें । आणखी रूप सुंदर तें ॥
पाप्याची दृष्टी पडतां । ओढवेल संकट मोठें ॥
लावण्य-संपदा तिजला । समयाला घातक, गमते ॥
मनिं येती दुष्ट विचार
कल्पना धांवती स्वैर
हा मुक्या मनाचा मार
सोसवे न आतां मजला । गरिबाचा वाली नुरला ! ॥

११

ज्या काळीं या जगतांत । मम नाथ जिवाचे होते ॥
दुःखाचे नसते वारे । मज कसलें ठाउक नव्हतें ॥
तें सौख्य अहा! तेव्हांचे । बाळीच्या नशिबीं नव्हतें ॥
प्रेमाच्या पहिल्या काळा
जन्म तिचा नव्हता झाला
आठवतां येइ उमाळा
सुखकाळ झडकरी गेला । गरिबाचा वाली नुरला! ॥

## १२

मदैव असे हें फुटकें । हे खेळ तयाचे असती ॥
हतभागी जीवालागीं । कोठली सुखाची शांती ॥
कोणत्या जन्मिचें कर्म । ओवढलें माझ्या पुढतीं ॥
शोधितां देह हा शिणला
बाहतां कंठ मम सुकला
भेटीव झणि प्रभो ! तिजला
शरणांगत या अबलेला । गरिबाचा वाली नुरला! "॥

## १३

ती माय पडे धरणीला । लागुनी ध्यास बाळेचा ॥
तें मातृ-हृदय ममतेचें । ढांसळे मेरु धैर्याचा ॥
न्हाणिली अधोभूसारी । लोटला पूर अश्रूंचा ॥
सारखी मोकली धाय
बापुडी अभागी गाय
तळमळूं लागली हाय !
आशेचा तंतू तुटला । गरिबाचा वाली नुरला ! ॥

१४

इतक्यांत धांवुनी आली । चुकलेली हरिणाक्षी ती ॥
मारुनी हांक मातेला । जाऊनी ठाकली निकटीं ॥
भानावरि येउनि माता । तिजकडे फेंकिली दृष्टि ॥
मग माय बालिका तेथें
भेटलीं एकमेकांतें
कुरवाळुनि माता पुसते
"होतीस कुठें तूं बाळा ?" । गरिबाचा वाली नुरला !॥

१५

"बोलविलें यवनें माते ! । घालितों अन्न ये बाळे ॥
एकिकडे सदन तयाचें । मज आंत तयानें नेलें ॥
आमीष दावुनी मजला । कामांध यवन-खळ बोले, ॥
"इष्कबाज तरुणी असशी
कां उगाच नखरा करिशीं
दुःखांत दिवस घालविशी"
फसवुनी घातला घाला । गरिबाचा वाली नुरला !॥

१६

कापट्य तयाचें कळलें । नेत्रां मम चढली लाली ॥
प्रतिकार करावा कैसा । संतापें तनु थरथरली ॥
पुण्याचा सांठा नसतां । भगवंत कसा हो वाली ? ॥
विनवणी तयाची केली
परि दया न त्याला आली
मति माझी कुंठित झाली
छळण्या मज जवळीं आला । गरिबाचा वाली नुरला! ॥

१७

त्या सूड कसा गे, घेऊं? । दुबळी मी, शस्त्र न हातीं ॥
रडुनियां नेत्र हे सुजले । जन्माची झाली माती ॥
हे समाज-कटंक देवा! । आह्मां भगिनींनां छळिती! ॥
आमीष पाहुनी भुलल्यें !
नच विचार करितां गेलें
उन्मत्ता करिं सांपडलें
खदखदा काळ तो हंसला । गरिबाचा वाली नुरला! ॥

१८

अंधार कृष्ण रात्रीचा । दिवसाहि तिथें मज दिसला॥
घाबरी जाहलें फार । अंगावर कांटा उठला ॥
येणार कोणता पुढतीं । तो प्रसंग मज जाणवला॥
त्या बघतां थरकें चित्त
तो भीषणसा एकांत
पातला काळ कल्पांत
मज लगट कराया सजला । गरिबाचा वाली नुरला!॥

१९

मी धडपड केली आई । बाहेर पडाया तिथुनी ॥
कर माझा धरुनी त्यानें । ठेविली उभी डांबोनी ॥
होणार काय गति आतां । दैवाची विपरित करणी॥
व्याघ्र मुखीं धेनू जैसी
अधमाकारिं पडल्यें तैशी
करुं काय अशा समयासी ?
दुःख भाग दैवीं लिहिला । गरिबाचा वाली नुरला !॥

२०

बोलला नराधम बोल । " हे नाजुक-माशुक पोरी ॥
ही फेंक भिकेची झोळी । मजजवळीं राहे प्यारी ॥
मोलाचे माणिक मोती । देईन शालु जरतारी " ॥
घालुनी अचानक घाला
झोंबला दुष्ट अंगाला
चांडाळ वैरि तो मेला
उन्मत्त पशू जणुं झाला । गरिबाचा वाली नुरला ! ॥

२१

निरि हिसडुनि एक करानें । पावित्र्य भ्रष्ट मम केलें॥
देउनी दोष दैवाला । स्फुंदुनी स्फुंदुनी रडल्यें ॥
विधिलिखित टळेना कोणा । होणार होउनी गेलें ॥
वदला मग " सदनीं राही
जीवाची कलिजा होई !
तुज न्यून कशाचें नाहीं "
नीतीची चाड न त्याला । गरिबाचा वाली नुरला ! ॥

२२

त्या अधमाधम चांडाळें । मम दशा दशा गे, केली ॥
राहिला न शरिरीं त्राण । गात्रें हीं विगलित झालीं ॥
तूं दूषण देइ न मातें । कुलकलंकि जन्मा आली ॥
गे, अश्रू ढाळुनि शिणले
कोरडे नेत्र हे झाले
दैवानें भालीं लिहिलें
विफल हा जन्म मम झाला । गरिबाचा वाली नुरला! ॥

२३

भिक्षेसि कशी मी जाऊं? । हा भ्रष्ट देह घेउनिया ॥
जगणें न हिताचें आई! । मज नको नको ही काया ॥
पूस हे अश्रु नयनींचे । दे सोडुनि सारी माया ! ॥
अडवुं नको मजला आई !
अंगाची होते लाही
मरणाविण सुटका नाहीं !
हा डाग शिलावरि पडला । गरिबाचा वाली नुरला ! ॥

२४

तव पोटीं मी गे! आई, । चांडाळिण जन्मा आल्यें! ॥
जन्मतांच हातोहात । कां नाहिं जगांतुनि केलें ॥
भ्रष्ट असें लाजिरवाणें । जीवित हें माझें कसलें! ॥

दुर्दैव दुर्विलासाचें
कीं पाप पूर्वजन्मीचें
ओढवलें गमतें साचें

अपमान कडा कोसळला । गरिबाचा वाली नुरला !॥

२५

मी अबला दीन अनाथ । चरफडुनी लाभ न कांहीं ॥
परमेश दिनाचा वाली । त्यावाचुनि शास्ता नाहीं ॥
भो जगन्निवासा सदया! । तव चरणीं ने लवलाही "॥

× × × × ×

घेतला विषाचा पेला
देहाचा भडका झाला
चैतन्य दीप मालवला!!

तें दृश्य न बघवें डोळा । गरिबाचा वाली नुरला ! ॥

२६

फोडिला करुण हंबरडा । त्या भिकारणीनें जेव्हां ॥
कवि रस्त्यावरूनी जातां । क्षणमात्र थबकला तेव्हां ॥
हाय या अनाथ जिवाचा । कां दुःखद शेवट व्हावा!॥
धिक् जिणें आर्य बंधूनों !
धिक् धर्माचि मार्तंडांनों
लाज ना काय षंढांनों !
गरिबाचा पालन वाला । या जगतीं कोणि न उरला!

× × × ×

२७

( चालः-निज बाळारे, गाणें गाते आई- )

"कां भगवंता, निष्ठुर मनिं झालासी ।
दीनेचा अंत पहासी ? ॥
करुं काय अतां, कोण संकटीं येई ।
धांवुनी धीर मज देई ॥
मन बावरलें, शून्याचि भासें सारें ।
मम जगतीं कांहिं न उरलें ॥
जीवाचें वाहीं फूल
पाडु नको ! देवा, भूल

करि दीनांचा सांभाळ
बाळेविण मी, अनाथ जगिं परदेशी, ।
दीनेचा अंत पहासी ॥

२८

मम दुःखाची, कल्पना न ये इतरां ।
दैवाचा खेळचि सारा ॥
या वृद्धपणीं, शक्ति न देहीं कांहीं ।
जड जीवित मजला होई ! ॥
गुणि बाळेचा, मृत्यु पाहिला डोळां ।
कासाविस प्राण जहाला ॥
कोणासाठीं, राहुं जगीं या आतां ।
प्रियबाळा माझी नसतां ॥
स्वर्गांतुनि पाहे सोनी ;
संबंध जगाचा त्यजुनी ॥
बोलावी मज ये ह्मणुनी ।
मज क्षमा करा, विनवितसे सकलाला ।
गरिबाचा वालीं नुरला ! ॥

२९

ढाळुनि अश्रू, नेत्र सुकोनी गेले।
भोगणें कपाळीं आलें॥
मजवाटे कीं, पुण्य गांठिचें सरलें।
प्रीतीचें बंधन तुटलें!॥
जलडोहीं या, लोटुनि देत्यें काया
जात्यें सोनिस भेटाया"॥

× × × × ×

क्षण दुभंगलें जल, फिरुनी
जाहलें शांत, तें बघुनी
कवि परते गृहिं तेथूनी
वर्णन कवनीं, सांगे मग जगताला॥
गरिबाचा वाली नुरला!॥

! !! !!!

लक्तरें शरीरी असलीं। हें भिकारिणीचें दृश्य!



# भिकारीण.

( लेखकः—अ. जि. कमतनूरकर. )

मे महिन्यांतील दिवस. मनस्वी ऊन. अशा वेळीं एक भिकारीण आपल्या मुलाला कडेवर घेऊन रस्त्यानें चालली होती. उन्हामुळें पायाला चटके बसूं लागले; तशी ती जवळच्या एका घराच्या बाहेरील बाजूस विश्रांतिकरितां बसली. मुलगा भूक ह्मणून रडूं लागतांच, तिनें आपल्या जीर्ण झोळींतून एक भाकरीचा तुकडा काढून, त्याच्या हातांत दिला. मुलगा तो तुकडा खात आनंदानें इकडे तिकडे बागडूं लागला. सदरील घराच्या श्रीमंत मालकाची मुलगी सहजगत्या बाहेर आली. मुलगा खात असलेल्या भाकरीच्या तुकड्यांतील कांहीं चुरा खालीं पडतांच, त्या मुलीनें सहज लीलेनें लाथेनें त्या मुलाला ढकललें; ह्मणून तो मुलगा रडूं लागतांच, भिकारणीनें त्याला जवळ घेऊन समजूत करीत ह्मटलें, "एका ठिकाणीं बैस ह्मणून तुला सांगत असतां इकडे तिकडे कशाला नाचूं लागलास? बाई, मुलाला लाथेनें मारण्याऐवजीं तोंडानें सांगितलें असतें तर—"

'भिकारडे! सारी घाण केलीस, आणखी माझ्यावरच डोळे वटारतेस? दम धर, बाबांना सांगून तुला इथून

घालवून देतें!' असें ह्मणत फणकाऱ्यानें ती मुलगी आपल्या वडिलांना सांगण्यासाठीं आंत गेली. घरचे मालकसाहेब मुलीचें गाऱ्हाणें ऐकून, भिकारणीला शासन करण्यासाठीं हातांत कांठी घेऊन बाहेर आले.

'काय ग ए, माझ्या मुलीला वाटेल तसे बोलण्याचा तुला काय अधिकार आहे? तूं भिकारडी! तुला इतका अभिमान पाहिजे कशाला? तूं इथें कशासाठीं बसलीस? अगोदर इथून चालती हो पाहूं!'

'दादा! ऐकून तरी घ्या मी काय ह्मणतें तें! मी तुमच्या मुलीला काइ बी ह्मटलं नाहीं! काय ग बाई, मी तुला शिव्या कां दिल्या?'

बाबा, ही भिकारडी कीं नाहीं, माझ्यावर डोळे वटारते.

हे पहा, तसला फाजीलपणा माझ्यापुढें चालावयाचा नाहीं. डोळे बाहेर काढून जन्माची आंधळी करून ठेवीन.

अव, दादा, काय बोलतां हें? मी कांहीं इथें दिवस काढण्यासाठीं आलें नाहीं. घटकाभर बसून ऊन उतरल्यावर जाईन!

ह्मगजे? तुझ्या बापाचेंच कीं नाहीं हें घर! मस्तवाल रांड!

' रांड ' ह्मणतांच भिकारणीला संताप आला, पण संतापून तरी काय करणार. तिनें शांतपणें ह्मटलें:—

' माझा नवरा मेला तेव्हांच मी रांड होउन घरोघर भिक्षा मागत फिरत आहे ! माझा नवरा असता तर कशाला ही दशा आली असती ! दादा, आपण मला विसरलेल्या दुःखाची आठवण करून दिलीत. ' भिकारीण पदरानें डोळे पुसूं लागली.

अशी रडतेस कशाला ? तुला रडावयाचेंच असेल तर रस्त्यावर उभी राहून वाटेल तितका वेळ रड !

पण दादा, मी असा अपराध तरी काय केला ?

माझी मुलगी तुला कोण वाटते ? मी मनांत आणीन तर साऱ्या भिकाऱ्यांना गांवाबाहेर हांकलून मोकळा होईन ! तुह्मीं वाढूनचाढून दारावरची कुत्री ! भाकरीचा तुकडा नाहीं मिळाला तर शंख न करितां दुसरें घर पहावें. ऊठ, ऊठ आतां ! अरे रामा, या जागेवर गोमुत्र शिंपडून सारवून घे पाहूं !

दादा, उन लई आहे. आनखी घटगाभर बसून—

तें काहीं चालावयाचें नाहीं ! अगोदर एथून चालती हो ! तें पहा ! तुझ्या पोरानें काय घाण केली? दम धर, अशानें तूं नाहींच जाणार! लकडीशिवाय मकडी वळत नाहीं ! दिलाच पाहिजे तडाखा, असें ह्मणून त्या गृह-

स्थानें भिकारणीला मारण्यासाठीं काठीं उगारली. तोंच भिकारणीच्या पोरानें धांवत येऊन, नका हो आईला मारूं ! ह्मणत भिकारणीच्या गळ्याला घट्ट मिठी मारली. कांठीचा तडाखा त्या भिकारणीऐवजीं मुलाच्या डोकीला बसतांच– आई ग ! ह्मणत मुलगा बेशुद्ध पडला. भिकारणीनें किंकाळी फोडली व मुलाला सांवरून मांडीवर घेतलें, आणि त्याला शुद्धीवर आणण्याचा ती प्रयत्न करूं लागली.

× × × ×

दहा वर्षांनंतरची हकीकत. वरील श्रीमान गृहस्थाची गृहस्थिती अतिशय खालावली होती. त्याचा एकुलता एक मुलगा टायफॉईडनें मृत्यु पावला. मुलीचा संसार सुखाचा होता, पण दैवाला तेंहि पाहवलें नाहीं. लग्नानंतर चारपांच वर्षांनीं मुलगी विधवा होऊन घरीं परत आली. त्या गृहस्थाचा आतां कसला संसार ! परमेश्वराचें नामस्मरण करीत तो शेष आयुष्य कंठीत होता.

एक दिवस तो प्राप्त परिस्थितीबद्दल विचार करीत रस्त्यानें चालला असतां समोरून येणाऱ्या भरधांव मोटारीचा त्याला धक्का लागला. तो जमिनीवर धाडकन् पडणार तोंच एका भिकारणीनें धांवत येऊन त्याला बाजूला सारले, पण परोपकार करीत असतां, त्या

[library stamp]

भिकारणींचा पाय मोटारीच्या चाकाखालीं सांपडून अजिबात मोडून गेला. भिकरणीला तशा स्थितींतच त्याच मोटारींतून हॉस्पिटलकडे पोचविण्यांत आलें.

केवळ आपल्यामुळें भिकारणीनें स्वतःवर संकट ओढून घेतलें तेंव्हा तिचा समाचार तरी घ्यावा या उद्देशानें तो गृहस्थ वरचेवर हॉस्पिटलकडे जाई.

भिकारीण पायाच्या वेदनेमुळें अतिशय तळमळत होती.

बाई आतां तुला कसें वाटतें ?

दादा, कसें आणि काय ? क्षीण स्वरांत भिकारीण बोलूं लागली मी फार दिवस जगेन असें वाटत नाहीं. मरण्यापूर्वी माझ्या मनाला लागलेली टोंचणी तुह्मांला सांगतें. मी जन्माची भिकारीण नव्हें. परिस्थितीनें मला दारोदार भटकावें लागलें. माझा नवरा व्यसनांपायीं गमावला. पोटासाठीं मीं माझ्या बाळाला घेऊन भिक्षा मागूं लागलें. अशीच एकदां मी बाळाला घेऊन भिक्षा मागीत उन्हांत उभी होतें. पायाला चटके बसूं लागले ह्मणून, विश्रांति साठीं जवळच्या एका घराच्या बाजूला मी बसलें. माझा बाळ भाकरी खात खेळत होता. त्या घरच्या मालकाच्या मुलीनें माझ्या बाळाला लाथेनें ढकललें. माझा बाळ रडूं लागला. मीं त्याला जवळ घेऊन त्याची समजूत करूं लागलें, पण हें काय ? दादा, तुमच्या डोळ्यांत काय ह्मणून पाणीं आले ? मला पूर्वीची आठ-

वण झाली ह्मणून सांगतें. मला घोटभर पाणी पाजा.

थोडेसें पाणी पितांच भिकारणीला हुशारी आली, आणि ती परत आपली हकीकत सांगू लागली. दादा पुढें त्या घरचा मालक बाहेर आला. त्याची आणि माझी तोंडा-तोंडी झाली. त्या मालकानें आपल्या श्रीमंतीच्या तोऱ्यांत आपल्या हातांतील काठीनें माझ्या बाळाला मारलें. माझा बाळ त्या मारामुळें बेशुद्ध पडला आणि दादा, पुढें एक दोन तासांनीं तो मला सोडून गेला!! हायरे देवा! अग आई ग!' भिकारीण जास्तच विवळूं लागली.

बाई--त्या गृहस्थानें रडण्या स्वरांत ह्मटलें, मला क्षमा करा! तुझ्या बाळाला मारणारा हाच तो चांडाळ. श्रीमं-तीच्या तोऱ्यांत मी किती तरी गरिबांना त्रास दिला. परमेश्वरानें मला योग्य प्रायश्चित्त दिलें! माझा एकुलता-एक मुलगा गेला आणि मुलगी तीहि पण विधवा—पुढें त्याच्यानें बोलवेना-तो मूक अश्रू ढाळूं लागला.

हादा, मी बोलूं नये तें बोलून गेलें. माझें बोलणें तुमच्या मनाला लागलें असें दिसतें. तो पहा केवढा तरी मोठा प्रकाश दिसतो आहे. बाळा, आलें थांब!

भिकारीण असंबद्ध बडबडूं लागली, आणि थोड्याच वेळांत तिनें आपले डोळे फिरविलें.

दा. क्र. ४५०६

REFBK-0004506
REFBK-0004506

विक्रीस तयार !    विक्रीस तयार !!

कवि, अनंत जिवाजी कमतनूरकरांच्या

# नाट्यछटा

किंमत ४ आणे.

मिळण्याचा पत्ता:—

१ लेखकाकडे—बसवणगल्ली, घ.नं १४२०, बेळगांव.

२ माधव व्यंकटेश मंगसूळीकर, मिरज.

३ हिंदमाता एजन्सी, बेळगांव.

विक्रीस तयार!    विक्रीस तयार!!

कवि, के मोहनलाल वर्मा—कृत

श्रीशिवप्रताप किं, २ आणे. श्रीमती सा. स्व. कादंबरी किं. ४ आणे. सात सैतान ( विडम्बन काव्य ) किं ७ दिडक्या. स्वातंत्र्य-संजीवनी किं. २ आणे.

वरील सर्व पुस्तकें एकदम घेणारांस ट. ख. माफ.

छापत आहेत :— राजपूत वंशप्रभाकर, म. गांधींची विजय-समशेर ( काव्य )

हिंदमाता एजन्सी, बेळगांव.

---

हें पुस्तक श्रीयुत वेंकटेश श्रीनिवास पंडित, यांनीं आपल्या सीताराम प्रिंटिंग प्रेसमध्यें छापिलें व रा. रा. जी. ए. मांजरेकर, यांनीं बेळगांव येथें श्रीरामदेवगल्लींत हिंदमाता एजन्सी येथें प्रसिद्ध केलें,